Thomas Cook (India) Ltd.
Thomas Cook Building, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai - 400001
Board: +91-22-6160 3333
CIN: L63040MH1978PLC020717
A FAIRFAX Company

Thomas Cook Travel Smooth thomascook.in

4th August, 2019

The Manager,
Listing Department
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street
Mumbai – 400 001
Scrip Code: 500413

Fax No.: 2272 2037/39/41/61

The Manager,
Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, 5th Floor, Plot No.C/1
G Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E)
Mumbai – 400 051
Scrip Code: THOMASCOOK

Fax No.: 2659 8237/38

Dear Sir/ Madam,

Sub: Intimation of Newspaper publication made in respect of Meeting of Equity Shareholders of Thomas Cook (India) Limited convened pursuant to the direction of National Company Law Tribunal

Ref.: Composite Scheme of Arrangement and Amalgamation amongst TC Forex Services Limited (Formerly known as Tata Capital Forex Limited), TC Travel Services Limited (Formerly known as TC Travel and Services Limited), SOTC Travel Management Private Limited (formerly known as SITA Travels and Tours Private Limited), Travel Corporation (India) Limited, Quess Corp Limited and Thomas Cook (India) Limited and their respective shareholders

This is in furtherance of our letter dated 26th July, 2019 and pursuant to provisions of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and the Companies Act, 2013, please find enclosed, copy of Notice published on 4th August, 2019 in Newspaper viz. Navshakti, intimating about the Meeting of the Equity Shareholders convened pursuant to the direction of the National Company Law Tribunal, Mumbai Bench.

Request you to kindly take the same on record.

Thanking you,
Yours faithfully
For Thomas Cook (India) Limited

AMIT JYOTINDRA PAREKH
Digitally signed by AMIT JYOTINDRA PAREKH
Date: 2019.08.04 13:53:34 +05'30'

Amit J. Parekh
Company Secretary & Compliance Officer

Encl. a/a


आजचे कार्यक्रम

श्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालयाचा ४० वा वर्धापनदिन; प्रमुख उपस्थिती - डॉ. एम. एन. पटेल (कुलगुरू - परुळ युनिव्हर्सिटी, वडोदरा; डॉ. एम. एस. गोसावी (महासंचालक -गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक), प्रिन्सिपल डॉ. आर. जे. गुजराथी (कुलगुरू), स्थळ - गोखले महाविद्यालय मार्ग, गोराई रोड, एमएचबी कॉलनीजवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई; वेळ - सकाळी १०.३०

वाढदिवस



दिलीप प्रभावळकर, अभिनेता



अरबाज खान, अभिनेता

दीपक पाटील, किसान खेत मजदूर

गजानन घुगे, माजी आमदार

अविनाश पांडे, माजी आमदार

माधव सांगळे, निवृत्त आयएएस

मधुकरराव चव्हाण, माजी मंत्री

जयंत कृपलानी, अभिनेता

शेरॉन प्रभाकर, गायक

अक्षय कोरडे, रसायनी

श्रद्धा बेलसरे

मेधा गाडगीळ, आयएएस

डॉ. शरद कोलथे, सीएसआरडी,नगर

अभिजीत कांबळे, पत्रकार

दिनविशेष

साल घटना

१८५४ : जपानच्या जहाजातून अधिकृत हिनोमारा ध्वज **वापरण्यात** सुरुवात झाली.

१९१४ : पहिले महायुद्ध-जर्मनीने बेल्जियमवर चढाई केली. प्रत्युत्तरादाखल युनायटेड किंग्डमने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने तटस्थ असल्याचे जाहीर केले.

१९२४ : सोव्हिएत युनियन व मेक्सिकोमधे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.

१९४७ : जपानच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

१९५६ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे अप्सरा ही भारताची सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.

१९८४ : अपर व्होल्टा या देशाचे नाव बदलुन बुर्किना फासो असे करण्यात आले.

१९९३ : राजेंद्र खंडेलवाल या पुण्याच्या अपंग, परंतु जिद्दी साहसवीराने समुद्रसपाटीपासून १८,३८३ फुटांवर असलेली खारुंग ला ही खिंड आपल्या चार सहकाऱ्यांसह स्कूटरवरून (कायनेटिक होंडा) पार केली. त्याच्या या कामगिरीची 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस'मध्ये नोंद झाली.

१९९८ : फिलिपाइन्सच्या माजी अध्यक्षा कोरेझॉन ॲक्विनो यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठीचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.

२००७ : नासाचे फिनिक्स हे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.

पंचांग

आजमिती श्रावण शुद्ध चतुर्थी शके १९४१, शुद्ध चतुर्थी १८:४९ मि.पर्यंत, चंद्र नक्षत्र उत्तरा २५:४३ मि.पर्यंत, योग शिव २३:३७ मि.पर्यंत, चंद्र राशी सिंह ०९:२७ मि.पर्यंत, भारतीय सौर १३ श्रावण शके १९४१ म्हणजेच रविवार, ४ ऑगस्ट २०१९., मुंबई सूर्योदय- ०६:१५ मि., मुंबई सूर्यास्त - १९:१२ मि., मुंबई चंद्रोदय- ०९:२४ मि., मुंबई चंद्रास्त- २२:०६ मि., राहूकाळ - १७:३५ मि. ते १९:१२ मि.पर्यंत, यमगंडकाळ - १२:४४ मि. ते १४:२१ मि.पर्यंत, गुलिककाळ - १५:५८ मि. ते १७:३५ मि.पर्यंत. विनायक चतुर्थी, आदित्य पूजन, दुर्वागणपती व्रत, नाग चतुर्थी उपवास.

राशिभविष्य

मेष- सभा-संमेलनाची आमंत्रणे येतील. स्वखुशीने आपण उपस्थित राहाल. समारंभाच्या ठिकाणी रंगाचा बेरंग टाळा. इतरांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करा.

वृषभ- व्यवसाय-धंद्यातील नियोजन बदलावे लागू शकते. बदलत्या परिस्थितीनुसार जुळवून घ्यावे लागेल. कार्यात रस घ्यावासा वाटेल.

मिथुन- व्यवसाय-नोकरी-धंद्यातील कार्यानिमित्त जवळचे तसेच दूरचे प्रवास घडतील. कुटुंबातील समस्या मिटतील. व्यवहार जपूनच करावेत.

कर्क- तरुण-तरुणींना घेतलेल्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटेल. नोकरीत नव्या संधी निर्माण होतील. मात्र नवीन जबाबदाऱ्या स्वीकारा.

सिंह- नोकरी-व्यवसाय-धंद्यात अनुकूलता लाभल्याने खूश असाल. कुटुंबाच्या हौसेमौजेसाठी वेळ देऊन खर्च कराल. वेतनवृद्धीचे योग.

कन्या- कार्यरत महिला व विद्यार्थ्यांना नियोजन करावे लागेल. वेळेचे महत्त्व ओळखून हे बदल करावे लागतील. केलेल्या कामाची पावती मिळेल.

तुळ- कुटुंब-परिवारातील विवाहयोग्य मुला-मुलींचे विवाह ठरतील. काहींच्या विवाहाच्या तारखा निश्चित होतील. संमेलनास उपस्थिती लावाल.

वृश्चिक- विद्यार्थ्यांस आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करण्याच्या संधी लाभल्याने आनंदित राहाल. सल्ला-मार्गदर्शन घ्या.

धनु- विद्यार्थी वर्गाने आपण कार्यरत क्षेत्राकडे विषेशत्वाने लक्ष ठेवणे आवश्यक. तसेच अतिसाहस टाळा. इतरांच्या आग्रहास बळी पडू नका.

मकर- जुने मित्र-मैत्रिणी अचानक भेटल्याने रोजच्या दिनक्रमात बदल घडेल. विद्यार्थी-कलाकार-खेळाडू कर्तृत्व सिद्ध करतील.

कुंभ- विवाहेच्छुक तरुण-तरुणींच्या विवाह ठरण्यातील अडचणी दूर होतील. नातेवाईक, आप्तेष्ट मंडळींच्या वर्तुळातून मध्यस्थी यशस्वी होतील.

मीन- विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडण्याची शक्यता. काही अनपेक्षित घटनामुळे मनस्वास्थ्य हरवले जाईल.



कुंडलिकेला पूर

■ रोहा-अष्टमी शहरासह वरसे, रोठ, धाटावमध्ये पुराचे पाणी शिरले

■ रोहा-अष्टमीचा संपर्क तुटला, वाहतूक खोळंबली, प्रवासी रखडले

वार्ताहर

रोहा, दि. ३ - तालुक्यात होत असलेल्या जोरदार पावसाने रोह्याच्या कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडत गेल्या आठ दिवसांत दुसऱ्यांदा मोठी पूरस्थिती निर्माण केली.

पुरामुळे रोहा-अष्टमीदरम्यान असलेल्या जुन्या पुलावर ४ ते ५ फूट पाणी होते. तर नव्याने बांधण्यात आलेल्या उंच पुलाला लागून यंदा प्रथमच पाणी वाहत होते. पुराच्या पाण्यामुळे संपर्क तुटल्याने वाहतूक खोळंबली आणि प्रवासीही मोठ्या संख्येने रखडले. रोहा-अष्टमी शहरासह वरसे, रोठ, धाटाव मध्ये पुराचे पाणी शिरले.

शुक्रवारी दुपारनंतर झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण तालुक्याला झोडपून काढले. धुवांधार कोसळणाऱ्या पावसाने कुंडलिका नदीला पूर आला. रात्री ९ वाजल्यानंतर नदीची पाणी पातळी जलद गतीने वाढू लागली. परिणामी रोहा शहरातील नगर पालिका चौक, सावरकर मार्ग, कोर्ट रोड, मुख्य बाजारपेठ, सत्यनारायण रोड, बोहरी गल्ली, फिरोज टॉकीजलगत सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

पुराचे पाणी बायपास रोड, दमखाडी, रायकर पार्क, चनेवाला कॉम्प्लेक्स, डबीर चाळ, गोकुळ बिल्डिंग, मुरुड रोड, अष्टमीसह वरसे, रोठ, धाटावमध्ये शिरले. रात्रीच्या वेळी वस्तीत पाणी शिरू लागल्याने नागरिकांची धावपळ उडाली. अष्टमीत रस्त्यावर पाणी भरल्याने पलीकडील गावांचा संपर्क तुटला. पाणी गतीने वाढू लागल्या नागरिकांनी रात्र जागून काढली. रोह्याचे नगराध्यक्ष संतोष पोटफोडे रात्री उशिरापर्यंत नागरिकांच्या संपर्कात राहून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. सामाजिक कार्यकर्ते हर्षद साळवी, नितीन परब, सुरेश मगर, रवींद्र चाळके, राजेश काफरे, महेंद्र मोरे, अमित उकडे, सतीश साठे, निलेश शिर्के, सचिन शेडगे, शशिकांत मोरे, डॉ. देशमुख, अतिष गोरेगावकर, जगदीश नागोठकर, अमित खातू, विशाल साळवी आदी रोहेकर मध्यरात्रीपर्यंत शहरात ठिकठिकाणी वाढणाऱ्या पाणि पातळीचा आढावा घेत मदतीसाठी तत्पर होते.

कुंडलिका नदी पात्रात करण्यात आलेल्या मोठ्या भरावामुळे शहरातील सखल भागासह वरसे, रोठ आधी नदीलगतच्या परिसरात पुराचे पाणी शिरले. यंदा प्रथमच नव्याने बांधण्यात आलेल्या उंच पुलाला लागून पाणी वाहत होते. त्याचप्रमाणे कधी नव्हे ते रोठ आणि उडदवणेदरम्यान असलेल्या नदीवरील पालदाड पुलाला लागून पाणी वाहत होते. वरसेत सखल भागात पाणी जमायचे, मात्र यंदा रोहा पब्लिक स्कूलमागील भागात, संजिवनी हाईट्स परिसरात ४ ते ५ फूट पाणि थांबले होते.

रात्रीपासून वाहतूक बंद राहिल्याने विद्यार्थी, कामगार वर्ग, एसटी बसेस, कंपनी बसेस इत्यादींना सतर्कतेच्या कारणास्तव थांबवण्यात आले होत्या. तर मोठ्या प्रमाणात वाहने अष्टमीपलीकडे अडकून राहिली होती. शनिवारी बहुतेक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. तर नागरिकांना दक्षतेच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या आहेत.

> सर्व नागरिकांनी सतर्क राहावे. धरणाच्या पाण्याची पातळी वाढल्याने पाणी सोडण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे कुंडलिकेच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. तरी नदी काठच्या रहिवाशांनी सावध राहावे. कृपया नदीवरील पुलाजवळ, वरून ये-जा करू नये.
>
> **- संतोष पोटफोडे,**
> **नगराध्यक्ष रोहा नगर परिषद**

कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. तरी रोहे-अष्टमीला जोडणारा जुना पूल पाण्याखाली आहे. पुलावरून जाताना कोणीही धोका पत्करू नये. आपली काळजी घ्या, कोणाला काही अडचण अथवा मदत हवी असल्यास ८२३७३५२१११/ ७५०७९४६१६२ या नंबरवर संपर्क करावा.

- हर्षद साळवी,
सामाजिक कार्यकर्ते

भातसा नदीकाठच्या गावांना इशारा



वार्ताहर

शहापूर, दि. ३ - सततच्या पावसामुळे शहापूर तालुक्यातील भातसा धरणाचे पाच दरवाजे २.५० मीटर इतके उघडण्यात येऊन भातसा धरणातून सुमारे ९३४ क्युसेक्स विसर्ग प्रवाहित केला जात आहे.

भातसा नदीच्या तिरावरील शहापूर-मुरबाड रस्त्यावरील सापगाव पूल, सापगाव व नदी काठावरील गावांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या काळात कोणत्याही प्रकारे वाहत्या पाण्यात प्रवेश न करण्याच्या व दक्षता घेण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे यांनी दिल्या आहेत. शहापूर तालुक्यात मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. तालुक्यातील अनेक मार्गांवरील बस वाहतूक ठप्प झाली होती.

भिवंडीत मुसळधार पाऊस!

पूरस्थितीमुळे पाचशे रहिवाशांचे स्थलांतर

वार्ताहर

भिवंडी, दि. ३ - भिवंडी शहरात व परिसरात रात्रीपासून मुसळधार पाऊस होत आहे. भिवंडी शहरात अनेक ठिकाणी घरात व दुकानांत पाणी शिरले आहे अनेक सकल भागांत पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून शहरातील अनेक शाळांनी विद्यार्थ्यांना सुट्टीही दिली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. भिवंडी व ग्रामीण परिसरात पूरस्थिती निर्माण झाली असून शेतात पाणी साचून राहिल्याने भातशेती कुजून नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरातील नदीनाका, समृद्धीबाग, कारीवली, नालापार, हंडी कम्पाऊंड, निजामपुरा, तीनबत्ती, बजारपेठी, देवनगर, बंदर मोहल्ला, सौदागर मोहल्ला, इदगाह, पद्मानगर, कल्याण नाका, भंडारी, कामतघर, काल्हेर, मानकोली आदी परिसरात पाणी साचले होते.

रांजणोली नाका येथील आमंत्रण टाटा प्रोजेक्ट पाण्याखाली गेल्याने तेथील रहिवाशांनी तीव्र नाराजगी व्यक्त केली. भातसा व वैतरणा दुथडी भरून वाहू लागल्याने व केलठण पुलावरून पाणी गेल्याने २० गावांचा संपर्क तुटला आहे. बंदर मोहल्ला येथील खोणी पुलावरून पाणी वाहू लागल्याने ४० गावांचा सपंर्क तुटला आहे. कामवारी नदीकाठच्या रहिवाशांच्या झोपड्यांत पाणी शिरण्याची शक्यता लक्षात घेऊन पालिका प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी पालिकेने शाळा, समाजगृह इत्यादी ठिकाणी राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याचे तहसीलदार शशिकांत गायकवाड यांनी सांगितले. तर नदी काठावरील ५०० रहिवाशांना हलवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. भिवंडीत रात्रीपासून १३० मि.मी., तर १ जूनपासून आजपर्यंत २६२७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.



पावसाने पालघर जिल्ह्याला झोडपले

प्रतिनिधी

पालघर, दि. ३ - जिल्ह्याला पावसाने शनिवारी पुन्हा एकदा झोडपून काढले. परिणामी जिल्ह्यातील शहरे तसेच ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. गेल्या चोवीस तासांत सरासरी १५७.१५ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पाऊस पालघर तालुक्यात झाला. तर सर्वात कमी पाऊस मोखाडा तालुक्यात पडला.

गुरुवारी रात्रीपासून जिल्ह्यात मुसळधार वृष्टी सुरू आहे. त्यामुळे पालघर, वसई, नालासोपारा, मनोर, वाडा या शहरांतील अनेक परिसर पाण्याखाली गेले. पालघर-मनोरदरम्यान सूर्या नदीवर असलेल्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. तर वाडा शहर व ग्रामीण भागातही जागोजागी पाणी साचले होते.

विरार पूर्वेस ऊसगाव-भाताणे परिसरात तानसा नदीचे पाणी पुलावरून वाहू लागले आहे. यामुळे सुमारे १२ ते १३ गावांचा तालुक्याशी असलेला संपर्क तुटला आहे. याचदरम्यान, धामणी धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्याने ग्रामीण भागातील अनेक परिसर जलमय झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच समुद्रकिनारी राहणाऱ्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. येत्या २४ तासांत पुन्हा मुसळधार वृष्टी होण्याची शक्यता वेधशाळेने व्यक्त केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. समुद्रातील भरती व प्रचंड उंचीच्या लाटा येणार असल्याने मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. या पावसाने ग्रामीण भागातील शेतकरी मात्र खुशीत आहेत. खोळंबलेली त्यांची शेतीची कामे जलदगतीने करणे शेतकऱ्यांना शक्य झाले आहे.

शब्दवेध 4188

जाहीर घोषणा, 5) निवडीचा हक्क, अभिप्राय, 6) आवड, चीक; 8) ढोर, 10) गंगा, 11) कवितेचा एक भाग, 13) कुलिखित, 14) अखंड, 17) पुत्र, 19) शरीर हलवीत मोठमोठ्याने *(हसणे किंवा रडणे)*, 22) निर्जन, 23) काष्टाढ्य; मेहनती, 24) वरचढ, 26) उद्धट, 28) फटफजिती, 29) गर्दी; रांग. *(उत्तर: पुढील अंकात)*

Created By AMRITA NANDANWAR 09822568532

मागील कोड्याचे उत्तर

नि	रो	प			अ	जि	जी		ल
दा		हि	क	म	ती		भा	री	व
न	व	ल		हा	व	रा			क
		वा	दं	ग		ह	क्क	दा	र
हे	वा	न			वे	पी		ख	
	रा		ग	ड	द		क	ल	ह
द	ण	क	ट		ना	पा	स		म
अ	जी		बा	ही		हु	र	हू	र
क			जी	व	घे	णा			स्ता

आडवे शब्द:- 1) चकाकी, 4) हिमतीचा, 7) नडलेला, 9) शिक्षा, 11) उकळी, 12) रक्तवाहिनी, 14) समुद्र, 15) अयोग्य, 16) पगार, 18) गुर्मी; ताठा, 20) नूतन, 21) पुढचा, 23) कच्च्या फळांचा रस, 25) एक नदी, 27) वकिली, 30) बारीक, 31) माडी, 32) निसरडा.

उभे शब्द:- 2) टिकाव, 3) पोपट, 4) ढोल वगैरे वाजवून केलेली

थॉमस कूक (इंडिया) लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : थॉमस कुक बिल्डींग, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. क्र.: +९१-२२-४२४२ ७०००, **फॅक्स :** +९१-२२-२३०२ २८६४, वेबसाइट : www.thomascook.in
टोल- फ्री क्र.: १-८००-२०९९-१०० **ईमेल :** sharedept@in.thomascook.com **सीआयएन : एल६३०४०एमएच१९७८पीएलसी०२०७१७**

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई यांच्या समक्ष

सी. ए. (सी. ए. ए.) क्र. २२८७/एमबी/२०१९
कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरणामध्ये
व
कंपनी कायदा, २०१३ च्या अन्य संबंधित तरतूद व अनुच्छेद ५२, ५५ व ६६
सहवाचन अनुच्छेद २३० ते २३२ च्या प्रकरणी
व
थॉमस कुक (इंडिया) लिमिटेडच्या प्रकरणी
थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ॲन्ड ट्रॅव्हल कॉर्पोरेशन (इंडिया) लिमिटेड व टीएस ट्रॅव्हल सर्व्हिसेस लिमिटेड व टीसी फॉरेक्स सर्व्हिसेस लिमिटेड व एसओटीसी ट्रॅव्हेल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड व क्वेस कॉर्प लिमिटेड व अन्य
त्यांचे संबंधित भागधारक यांच्या एकत्रीकरण व व्यवस्थेच्या संयुक्त योजनेच्या प्रकरणी

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड
(सीआयएन : एल६३०४०एमएच१९७८पीएलसी०२०७१७
कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत समाविष्ट कंपनी व त्यांचे
नोंदणीकृत कार्यालय थॉमस कुक बिल्डींग, डॉ. डी. एन. रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१, महाराष्ट्र भारत. ..... पहिली अर्जदार कंपनी/ टीसीआयएल/ कंपनी

कंपनीच्या इक्विटी भागधारक यांच्या सभेच्या सूचनेची जाहिरात

सूचना याद्वारे देण्यात येते की, दि. ११ जुलै, २०१९ रोजीच्या आदेशान्वये मुंबई खंडपीठ येथे सन्मा. राष्ट्रीय कंपनी विधी नयायाधिकरण (एनसीएलटी) यांनी पहिली अर्जदार कंपनी व दुसरी अर्जदार कंपनी यांच्या इक्विटी भागधारक व प्राधान्य भागधारक यांच्याकरिता सभा आयोजित केली होती व टीसी फॉरेक्स सर्व्हिसेस लिमिटेड (टाटा कॅपिटल फॉरेक्स लिमिटेड म्हणून ज्ञात), टीसी ट्रॅव्हेल सर्व्हिसेस लिमिटेड (पूर्वीचे टीसी ट्रॅव्हेल ॲन्ड सर्व्हिसेस लिमिटेड म्हणून ज्ञात), एसओटीसी ट्रॅव्हल्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे एसआयटीए ट्रॅव्हल्स ॲन्ड टूर्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात), ट्रॅव्हेल कॉर्पोरेशन (इंडिया) लिमिटेड, क्वेस कॉर्प. लिमिटेड व थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड व अन्य त्यांचे संबंधित भागधारक (योजना) यांच्या एकत्रीकरण व व्यवस्थेच्या संयुक्त योजनेच्या प्रकरणी सदर कंपनीचे इक्विटी भागधारक यांच्या दरम्यान व संबंधित भागधारक (योजना) झालेल्या संबंधित प्रस्तावित कराराच्या योजनेच्या विचारविनीमय, मान्यता देणे व सुधारणा करून त्यांची सभा आयोजित करण्यात आली आहे.

सदर आदेशाअंतर्गत पुढील सूचना याद्वारे देण्यात येते की, पहिली अर्जदार कंपनी यांच्या इक्विटी भागधारक यांची सभा पामा थाडानी ऑडिटोरिअम, जय हिंद कॉलेज, ए रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० येथे बुधवार, दि. ४ सप्टेंबर, २०१९ रोजी दु. ३.३० वा. आयोजित करण्यात आली आहे तर संबंधित अर्जदार कंपनीच्या इक्विटी भागधारक यांनी सदर सभेमध्ये इच्छुक राहण्याकरिता सदर वेळ व ठिकाणी भगधारकांना विनंती करण्यात येत आहे.

सभासद यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, सूचनेच्या संदर्भत दस्तावेज जे इक्विटी शेअर्सच्या सभेमधील थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड यांनी एनसीएलटी यांना अनुसार असतील व ते समभाग धाकर यांच्या पडताळणीकरिता थॉमस कुक यांच्या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालय पत्ता थॉमस कुक बिल्डींग, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे व कॉर्पोरेट कार्यालय पत्ता थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड, मॅराथॉन फ्युचरेक्स, ११ वा मजला, ए विंग, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०० ०१३ येथे स. १०.०० ते दु. १२.०० दरम्यान सर्व कार्यदिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळता) सभेच्या तारखेपासून १ (एक) दिवस पूर्व पडताळणीकरिता उपलब्ध असतील. सदर दस्तावेज सभेच्या ठिकाणी पडताळणीकरिता उपलब्ध असतील.

कंपनीच्या सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, सदर सूचना दि. ०२ ऑगस्ट, २०१९ रोजी पाठवणी पूर्ण केली आहे.

सभेची सूचना कंपनीची वेबसाइट www.thomascook.in वर उपलब्ध आहे.

टपाली मतदान सभासदांनी शनिवार, दि. ०५ ऑगस्ट, २०१९ रोजी स. ९.०० वा. आयोजित करण्यात आलेल्या व दि. ०३ सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.०० वा. संपणार असलेल्या दोन्ही टपाली मतदान व ईलेक्ट्रॉनिक माध्यम द्वारे मतदानाची नोंद घेणे आवश्यक आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने स्पष्ट व योग्य स्वरूपात मतदान पार पाडण्याकरिता श्री. डी. एम. दलाल, परिनीरीक्षक म्हणून कंपनी सचिव यांना टपाली मतदान प्रक्रिया आयोजित करण्याकरिता (प्रत्यक्ष व ई-मतदान) नियुक्त केले आहे. सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, संपूण भरलेले व स्वाक्षरी केलेले टपाली मतदान प्रपत्र परीनिरीक्षक यांना दि. २६ जुलै, २०१९ रोजी असून ई-मतदान मॉड्युल सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस यांच्याद्वारे दि. ०३ सप्टेंबर, २०१९ रोजी सां. ५.०० पर्यंत टपाली मतदान प्रपत्रांच्या पावतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाठवावे. तसेच ई-मतदान करण्याचा अधिकार सदर तारीखा व वेळेपश्चात दिला जाणार नाही.

टपाली मतदान सूचना व प्रपत्र ज्यांनी प्रत्यक्ष प्रतकरिता विनंती केली आहे अशा सभासदांना ईलेक्ट्रॉनिकली पाठविण्यात आले आहेत वा ज्यांचे ई-मेल आयडी डिपॉझिटरी पार्टिसीपंट्स (डीपी) यांच्यासह नोंदणीकृत नाहीत व डीपीसह नोंदणीकृत असलेल्यांचे ई-मेल आयडी व डिपॉझिटरीजद्वारे कंपनीकडे उपलब्ध असलेल्या व परीक्षक यांच्याकडे पोस्टेज प्रीपेड रिप्लाय लिफाफा यांच्यासह टपाली मतदान सूचनेची व टपाली मतदान प्रपत्रांची प्रत्यक्ष प्रत सर्व अन्य सभासद यांना परमिटेड मोडच्या माध्यमातून त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविण्यात आली आहे. सभासदांचे मतदान हक्क मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर, २०१९ रोजी (निर्धारित तारीखा) त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या कंपनीचे समभाग शेअर्स म्हणून मानले जातील.

सदर व्यक्तींना सभेमध्ये उपस्थित राहून मतदान करणे अनिवार्य आहे व सदर मतदान व्यक्तिश: वा प्रॉक्सीद्वारे सर्व प्रॉक्सीज प्रदानित व विहित प्रारूपामधील साक्षांकित प्रत वा प्राधिकृत सदर व्यक्तींच्या हस्ताक्षराने अर्जदार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे सभेच्या आत सादर करावी. प्रॉक्सी प्रपत्र अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालय येथून प्राप्त करता येईल.

सन्मा. न्यायाधिकरणाने श्री. माधवन मेनन (डीआयएन - ००००८५४२), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना व श्री. महेश अयर (डीआयएन ०७५६०३०२) यांना कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सदर सभेचे संचालक म्हणून नियुक्त केले आहे.

सन्मा. न्यायाधिकरणाने श्री. पी. एन. पारिख (सभासदत्व क्र. एफसीएस ३२७) यांना व अन्यथा श्री. मितेश धाबलीवाला यांना मे. पारिख ॲन्ड असोसिएट्स म्हणून कंपनीचे प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता म्हणून नियुक्त केले आहे व दुसरी अर्जदार कंपनीच्या इक्विटी भागधारक व प्राधान्य भागधारक यांच्या सदर सभेचे अध्यक्ष नियुक्त केले आहे.

सभासद अर्थात प्रत्यक्षरित्या टपाली मतदान प्रपत्र वा ई-मतदान यांच्याद्वारे केवळ मतदानाचा एक मोड प्राप्त करू शकतात. जर सभासदांनी ई-मतदानाच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष टपाली मतदान प्रपत्र यांच्या माध्यमातून मतदान केल्यास ई-मतदानाच्या माध्यमातील मतदान वैध मानले जाईल व प्रत्यक्ष टपाली मतदान प्रपत्र यांच्या माध्यमातून केलेले मतदान अवैध मानले जाईल व वेबसाइट www.evotingindia.com वर उपलब्ध फॉरगॉट यूजर तपशील/ पासवर्ड ऑप्शन वापर करून सीडीएसएल टोल फ्री क्र. १८००२२५५३३ वर संपर्क साधावा.

सभासद, ज्यांना जर सदर टपाली मतदान सूचना व प्रपत्र प्राप्त झालेले नसल्यास तसेच त्यांना आवश्यक असल्यास त्यांनी कंपनीची वेबसाइट www.evotingindia.com वरून सदर ड्युप्लिकेट प्रत डाउनलोड करावी वा ईमेल helpdesk.evoting@cdslindia.com करावा. ई-मतदान संबंधात कोणतीही चौकशी वा तक्रारीकरिता सभासदांनी Frequently Asked Questions (FAQ) व ई-मतदान मॅन्युअल वर हेल्प सेक्शन अंतर्गत उपलब्ध www.evotingindia.com पाहावी वा ई-मेल helpdesk.evoting@cdslindia.com करावा. टपाली मतदानाद्वारे मतदाना संबंधात अन्य माहितीकरिता ई-मतदानासह काही असल्यास श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅराथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल्स कंपाउंड, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०० ०१३ यांना ईमेल helpdesk.evoting@cdslindia.com वा दूर. क्र. १८००२२५५३३ वर संपर्क साधावा. टपाली मतदान व ई-मतदानाची अहवाल श्री. दीपक तांबे सहायक व्यवस्थापक, टीएसआर दरशॉ लिमिटेड, रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट, ६-१०, हाजी मुसा पत्रावाला इंडस्ट्रियल इस्टेट, २० डॉ. ई. मोजेस रोड, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११, महाराष्ट्र अहवाल स्टॉक एक्सचेंज, डिपॉझिटरीज, रजिस्टर व शेअर ट्रान्सफर एजन्ट यांना त्याच दिवशी कंपनीची वेबसाइट अर्थात श्री. अमित जे. पारेख, कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी कंपनीचे व ईमेल sharedept@in.thomascook.com वर प्रसिद्ध करण्यात येईल.

माधवन मेनन
सभेकरिता नियुक्त अध्यक्ष
डीआयएन : ००००८५४२

मुंबई
दि. ०२ ऑगस्ट, २०१९